**प्रेस नोट** दिनांक २०/०८/२०२६

''ऑनलाईन गेमिंग, क्रिकेट बेटिंग व कॅसिनोच्या नावाखाली सायबर फसवणुकीसाठी 'म्युल बँक अकाउंट' पुरविणाऱ्या आंतरराज्यीय रॅकेटचा पर्दाफाश''

गुन्हा रजिस्टर क्रमांक ५१०/२०२६ कलम ३१८(४), ३१७, ३(५) भा. न्या.संहिता, २०२३ सह कलम ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००

.........................................

डोंगरी पोलीस ठाणे सायबर पथकास प्राप्त झालेल्या विश्वसनीय व गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या नियोजनबद्ध तपासातून सायबर फसवणुकीसाठी म्युल बँक खाती उपलब्ध करून देणाऱ्या संघटित नेटवर्कचा पर्दाफाश करण्यात आला आहे. तपासा दरम्यान आर्थिकदृष्ट्या गरजू व्यक्तींना अल्प आर्थिक मोबदल्याचे आमिष दाखवून त्यांच्या नावाने बँक खाती उघडणे व सदर खात्यांचे पासबुक, डेबिट कार्ड, चेकबुक, सिमकार्ड आदी साधने ताब्यात घेऊन ती सायबर फसवणुकीतील आर्थिक व्यवहारांसाठी वापरण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले.

मुंबईतील गोवंडी, मानखुर्द, डोंगरी परिसर तसेच नवी मुंबईतील बेलापूर, पनवेल व उस्मानाबाद या ठिकाणी तपासाचा विस्तार करण्यात आला.

<u>०३ आरोपी अटक</u>

गोपनीय माहितीच्या आधारे सँडहर्स्ट रोड रेल्वे स्टेशन बाहेर, डॉ. महेश्वरी रोड, डोंगरी, मुंबई येथे कारवाई करून तसेच तपासादरम्यान एकूण ०३ आरोपींना अटक करण्यात आली.

१. निखिल कमलकुमार जसवानी, वय २८ वर्षे, रा. पिपरिया, जि. होशंगाबाद, मध्यप्रदेश.
२. राहुल श्यामलाल परवानी, वय ३२ वर्षे, रा. मध्यप्रदेश.
३. जय बिहारीलाल तीरथानी, वय २६ वर्षे, रा. कटणी, मध्यप्रदेश.

तसेच यामध्ये आत्तापर्यंतच्या तपासामध्ये एकूण ०५ पाहिजे आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यांचा शोध चालू आहे.

त्यामध्ये एकूण ०३ महिलांना भा.ना.सु.सं. कलम ३५(३) अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे-

१) ज्योती पाटील
२) जया डोंगरे
३) निशा डोंगरे सर्व राहणार लल्लूभाई कंम्पाउंड, मानखुर्द मुंबई

तपासा दरम्यान अटक आरोपीतांकडून आतापर्यंत खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

४२ बँक पासबुक, ७० डेबिट कार्ड, ३६ सिमकार्ड,२३ मोबाईल फोन, ०३ लॅपटॉप, ०१ टॅब, १२ बँक किट, ०१ मोटार कार असा एकूण अंदाजे किंमत रु ५० लाख चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

जप्त करण्यात आलेल्या डिजिटल उपकरणांमधील माहितीचे तांत्रिक विश्लेषण करण्यात येत असून, त्यातून या नेटवर्कशी संबंधित आणखी व्यक्ती व व्यवहार समोर येण्याची शक्यता आहे.

<u>एकूण जप्त ११० बॅक खात्यापैकी १७ बॅक खात्यांतून ३८ सायबर गुन्हे/तक्रारींचा उलगडा</u>

तपासादरम्यान जप्त ११० बँक खात्यापैकी आतापर्यंत १७ बँक खात्यांची माहिती संबंधित बँकांकडून प्राप्त झाली आहे. सदर खात्यांमधील आर्थिक व्यवहार, उपलब्ध तांत्रिक माहिती व विविध राज्यांतील सायबर गुन्हे/तक्रारी यांची पडताळणी केली असता, देशभरातील विविध राज्यांमध्ये नोंद असलेल्या ३८ सायबर गुन्हे/तक्रारींचा संबंध सदर खात्यांशी असल्याचे आतापर्यंत निष्पन्न झाले

आहे. उर्वरित खात्यांच्या तपासातून आणखी गुन्हे, संशयास्पद आर्थिक व्यवहार व संबंधित व्यक्तींचे नेटवर्क उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्यामध्ये खालीलप्रमाणे गुन्हे/सायबर तक्रारी निष्पन्न झालेल्या आहेत.

१) महाराष्ट्र-०२ त्यामध्ये नारपोलीस पोलीस स्टेशन जि.ठाणे-०१, खांदेश्वर पो.ठाणे. नवि मुंबई ०१
२) कर्नाटक-०९
३) तेलंगणा-०६
४) दिल्ली-०२
५) मध्यप्रदेश-०२
६) उत्तरप्रदेश-०५
७) केरळ-०२
८) तामीळनाडू-०२
९) गुजरात- ०२
१०) जम्मू कश्मीर-०१
११) पंश्चिम बंगाल-०३

यामुळे डोंगरी पोलीस ठाण्यातील सदर गुन्ह्याचा तपास मुंबईपुरता मर्यादित न राहता देशातील विविध राज्यांपर्यंत पोहोचला आहे.

२५ कोटी ४५ लाखांची आर्थिक उलाढाल

तपासातून उपलब्ध झालेल्या प्राथमिक माहितीनुसार संबंधित १७ बँक खात्यांमध्ये अवघ्या दीड ते दोन महिन्यांच्या कालावधीत सुमारे ₹२५ कोटी ४५ लाखांची आर्थिक उलाढाल झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर रकमेचा स्रोत, व्यवहारांची दिशा, लाभार्थी खाती, संबंधित व्यक्ती तसेच सायबर गुन्ह्यांशी असलेला संबंध याबाबत सखोल आर्थिक तपास सुरू आहे.

सायबर गुन्हेगारी विरोधात डोंगरी सायबर पथकाची प्रभावी कामगिरी

गोपनीय माहितीचे अचूक संकलन, तांत्रिक तपास, बँक व्यवहारांचा मागोवा, डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण आणि प्रत्यक्ष कारवाई यांचा प्रभावी समन्वय साधून डोंगरी सायबर पथकाने सायबर फसवणुकीसाठी म्युल बँक खात्यांचा गैरवापर करणाऱ्या आंतरराज्यीय नेटवर्कवर प्रभावी कारवाई केली आहे.

सदर कारवाईमुळे सायबर फसवणुकीतील आर्थिक व्यवहारांची साखळी शोधण्यास तसेच देशातील विविध भागांतील संबंधित गुन्ह्यांचा परस्पर संबंध उघडकीस आणण्यास महत्त्वपूर्ण मदत झाली आहे.

नागरिकांना महत्त्वाचे आवाहन

१) नागरिकांनी कोणत्याही व्यक्तीच्या आमिषाला बळी पडून आपले बँक खाते, पासबुक, डेबिट कार्ड, चेकबुक, सिमकार्ड, मोबाईल फोन, OTP,PIN अथवा इंटरनेट बँकिंगची माहिती इतरांना वापरण्यास देऊ नये.
२) आपल्या बँक खात्यात संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ संबंधित बँकेशी संपर्क साधून पोलीस यंत्रणेस माहिती द्यावी.

"आपले बँक खाते – आपली जबाबदारी" याची जाणीव ठेवून नागरिकांनी आर्थिक व डिजिटल व्यवहारांमध्ये सतर्कता बाळगावी.

## मार्गदर्शन व नेतृत्व

सदर उल्लेखनीय कारवाई मा. पोलीस आयुक्त, मुंबई शहर श्री. देवेन भारती साहेब, सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. मनोज शर्मा साहेब, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग श्री. शैलेश बलकवडे साहेब, मा. पोलीस उपायुक्त, दक्षिण परिमंडळ-१ श्री. मनीष कलवानिया साहेब, मा. सहायक पोलीस आयुक्त, डोंगरी विभाग श्री. तनवीर शेख साहेब व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डोंगरी पोलीस ठाणे श्री. सागर टिळेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सदर कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब कानवडे, पोलीस उपनिरीक्षक श्री. सुनील रणदिवे, पोलीस हवालदार जितेंद्र चौगुले, विशाल सोनावणे, पोलीस शिपाई सुरज धायगुडे व श्रीकांत गायकवाड यांनी महत्त्वपूर्ण सहभाग घेतला.

गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून, उपलब्ध पुरावे, आर्थिक व्यवहार व डिजिटल पुराव्यांच्या आधारे संबंधित नेटवर्कमधील इतर व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे.

डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई
मुंबई पोलीस